05 OCT 2026
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. राजनीश कामत व प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी, लाल बहादूर शास्त्रींना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. शुक्रवारी सकाळी शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. राजनीश कामत प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुखदेव उंदरे, स्कूल ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. अजित कोळेकर, डॉ. सोमनाथ पवार आदींसह शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

05 OCT 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शाहू अॅकॅडमीतून घडेल युवा पिढी : कुलगुरू डॉ. कामत

गारगोटी, ता. ४ : 'दीडशे वर्षांची परंपरा असलेल्या येथील शाहू वाचनालयात शाहू अॅकॅडमी सुरू होत आहे, ही कौतुकास्पद बाब आहे. युवा ही देशाची मोठी शक्ती असून, युवा शक्तीला घडविण्यासाठी वाचनालयाने पुढाकार घेतला आहे,' असे गौरवोद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केले.

शाहू वाचनालयामध्ये नव्याने सुरू केलेल्या 'शाहू अॅकॅडमी'च्या उद्‌घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी शाहू वाचनालयाचे अध्यक्ष तथा माजी आमदार बजरंग देसाई होते. नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात, गारवारे टेक्निकलचे चेअरमन डॉ. संजय चराटी, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शामराव देसाई, राजाराम कॉलेजच्या माजी प्राचार्या डॉ. अनिता बोडके, जिल्हा परिषद सदस्या रेश्मा देसाई प्रमुख उपस्थिते होते. मान्यवरांच्या हस्ते फीत कापून अॅकॅडमीचा प्रारंभ झाला.



गारगोटी : येथील शाहू वाचनालयात शाहू अॅकॅडमीच्या प्रारंभप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत. शेजारी बजरंग देसाई, डॉ. यशवंत थोरात, राहुल देसाई, मधुकर देसाई, पी. बी. पाटील, डॉ. संजय चराटी आदी.

यावेळी कुलगुरू डॉ. कामत यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक वातावरण व सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शाहू अॅकॅडमी उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी माजी पोलिस उपायुक्त रणजित देसाई, मौनी विद्यापीठाचे चेअरमन मधुकर देसाई, डॉ. पी. बी. पाटील, डॉ. उदयकुमार शिंदे, वाचनालयाचे उपाध्यक्ष डॉ. सुभाष देसाई, प्रा. स्वप्नील तांबेकर, सरपंच प्रकाश वास्कर, प्रताप मेंगाणे, प्रवीण गुरव यांच्यासह स्पर्धा परीक्षा तयारी करणारे विद्यार्थी, पालक तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. राहुल देसाई यांनी स्वागत केले. सर्जेराव देसाई यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अस्मिता प्रधान यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

05 OCT 2026
जनप्रवास

मौनी विद्यापीठात लवकरच कौशल्य प्रशिक्षण केंद्र

कुलगुरू डॉ. राजनीश कामत : मौनी विद्यापीठात शैक्षणिक 'मुक्त संवाद' कार्यक्रम : शिक्षण पद्धतीत बदल आवश्यक

जनप्रवास : गारगोटी

मौनी विद्यापीठाच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध शैक्षणिक प्रयोगांना शिवाजी विद्यापीठाचे सर्वोतोपरी सहकार्य राहिल. ग्रामीण-शहरी शैक्षणिक दरी कमी करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापरच आवश्यक आहे.तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्यास शैक्षणिक गुणवत्तां, दर्जेदार व कौशल्यपूर्ण शिक्षण, प्रशिक्षण मिळेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

येथील श्री मौनी विद्यापीठातर्फे आयोजित 'तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण- शहरी शैक्षणिक दरी कमी करणे' या विषयावरील मुक्त संवाद कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. मौनी विद्यापीठाचे चेअरमन मधुकरअप्पा देसाई अध्यस्थानी होते. नाबार्डचे माजी अध्यक्ष व महासंचालक मौनी विद्यापीठाचे डॉ. यशवंतराव थोरात, गरवारे टेक्निकल फायबर्सचे अध्यक्ष डॉ. संजय चराटी, डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण संकुलाच्या सी. ओ. ई. देवश्री पाटील, माजी प्राचार्या डॉ. अनिता बोडके, मौनी विद्यापीठाच्या विश्वस्त सौ. पल्लवी कोरगावकर,



गारगोटी : दीपप्रज्वलनप्रसंगी कुलगुरू डॉ. राजनीश कामत. शेजारी डॉ. यशवंतराव थोरात मधुकर देसाई, देवश्री पाटील, पल्लवी कोरगावकर.

सदस्य बाजीराव चव्हाण, कर्मचारी प्रतिनिधी डॉ. अरविंद चौगले, जिल्हा बँकेचे संचालक प्राचार्य अर्जुन आबिटकर प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, मौनी विद्यापीठात विविध कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे केंद्र सुरू केले जाईल. येथे अनेक लहान अभ्यासक्रम सुरू केले जातील. यासाठी शिवाजी विद्यापीठ पूर्णतः सहकार्य करेल. 'एक विद्यापीठ, दहा महाविद्यालये, शंभर शाळा' हा उपक्रम शिवाजी विद्यापीठाने हाती घेतला असून यामध्ये मौनी विद्यापीठाचा पहिला समावेश असेल. कमी कालावधीच्या अभ्यासक्रमांकडे सध्या विद्यार्थ्यांचा वाढता कल आहे. यासाठी त्यांच्या ऑनलाइन शिक्षण व थेट कृतीयुक्त प्रशिक्षणावर भर दिला जाईल.

डॉ. यशवंतराव थोरात म्हणाले, ग्रामीण आणि शहरी भागातील शैक्षणिक दरी कमी करणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांच्यात शिकण्याची क्षमता वाढविणे, विविध कौशल्ये आत्मसात करण्यासाठी त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे क्रमप्राप्त आहे. शिवाजी विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना सतत आवश्यक ज्ञान आणि तंत्रज्ञान उपलब्ध व्हावे. हे विद्यापीठ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या क्षमता निर्मिती आणि प्रत्यक्ष रोजगार देण्यातील दुवा ठरावे.

चेअरमन मधुकर देसाई म्हणाले, मौनी विद्यापीठाची ग्रामीण विद्यापीठ म्हणून आजही ओळख आहे. येथे विविध अभ्यासक्रम शिकविले जात असून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मौनी विद्यापीठ गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध आहे. दर्जेदार व नवीन तंत्रज्ञानातील अद्यावत व्यावसायिक व कौशल्यपूर्ण शिक्षण देण्यावर आमचा भर राहिल. रोजगाराभिमुख शिक्षण, संशोधन, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रभावी केंद्र करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

प्राचार्य डॉ. उदयकुमार शिंदे यांनी स्वागत केले. डॉ. संजय चराटी यांनी मनोगत केले. मौनी विद्यापीठाचे संचालक डॉ. पी. बी. पाटील यांनी आभार मानले. उपप्राचार्य डॉ. संजय देसाई, स्वप्निल तांबेकर यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक उपस्थित होते. डॉ. ऋतुजा लाड यांनी सूत्रसंचालन केले.

05 OCT 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' भावी पिढ्यांच्या चारित्र्यनिर्मितीचा दीपस्तंभ

माणिकराव साळुंखे : विद्यापीठात ग्रंथाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केलेला 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' हा ग्रंथ देशाच्या आत्म्याशी संवाद साधणारा आणि भावी पिढ्यांच्या चारित्र्यनिर्मितीचा दीपस्तंभ ठरेल, असे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात डॉ. साळुंखे यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन झाले. वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष आणि कला व साहित्य मंडळातर्फे हा कार्यक्रम झाला. यावेळी डॉ. अरुण भोसले, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक वसंतराव माने, विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. दत्तात्रय मचाले, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

डॉ. भोसले म्हणाले, कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील ३६६ स्वातंत्र्यसैनिकांच्या शौर्यगाथा संशोधन, मुलाखती व दस्तावेजांच्या आधारे या ग्रंथात नोंदविल्या. डॉ. शिर्के म्हणाले, देशाला मिळालेले स्वातंत्र्य सहज, सोपे वा स्वस्तात मिळालेले नाही. त्यामागे असंख्य स्वातंत्र्यसैनिकांचा त्याग, संघर्ष आणि बलिदान आहे.



शिवाजी विद्यापीठात 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' ग्रंथाचे प्रकाशन डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले. यावेळी डॉ. अवनीश पाटील, डॉ. अरुण भोसले, डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. दत्तात्रय मचाले उपस्थित होते.

स्वातंत्र्यसैनिकांच्या नोंदलेखकांचा झाला गौरव

कोल्हापूर समन्वयक डॉ. धीरज शिंदे, सांगलीचे डॉ. भारतभूषण माळी, साताराचे डॉ. अजितकुमार जाधव, प्राचार्य विलास पवार, राहुल रेपे, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, निवेदक डॉ. सुस्मिता खुटाळे तसेच तिन्ही जिल्ह्यांतील स्वातंत्र्यसैनिकांच्या नोंदलेखकांचा प्रशस्तिपत्र, पुष्प आणि ग्रंथभेट देऊन गौरव झाला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. इस्माइल पठाण, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. भारती पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, डी. जी. भास्कर उपस्थित होते.
डॉ. अवनीश पाटील आणि डॉ. दत्तात्रय मचाले यांनी ग्रंथाचे संपादन केले आहे.

05 OCT 2026

सकाळ

मराठी भाषा परंपरेचे आज विद्यापीठात गौरवगान कार्यक्रम



कोल्हापूर : शासनाच्या भाषा विभाग व शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे अभिजात भाषा गौरव दिनानिमित्त सोमवारी(ता. ५) विद्यापीठात मराठी कविता व गीतांच्या सांगीतिक, सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. अभिजित कोसंबी, प्रसेनजीत कोसंबी, दिगंबर नाईक हे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणार आहेत. सुभाष नकाते यांच्या नृत्य कलावंताचा संच सोबत आहे. मराठी ओवी, लोकगीते ते आधुनिक गीतांचे सादरीकरण या कार्यक्रमात होणार आहे. संतपरंपरा ते आधुनिक मराठी भाषेचे विविध आविष्कार सादर होणार आहेत.

05 OCT 2026
पुण्यनगरी

मराठी भाषा परंपरेचे आज विद्यापीठात गौरवगान

कोल्हापूर : महाराष्ट्र शासनाच्या भाषा विभाग व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अभिजात भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी शिवाजी विद्यापीठात मराठी कविता व गीतांच्या सांगीतिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

यामध्ये अभिजित कोसंबी, प्रसेनजित कोसंबी, दिगंबर नाईक हे कलावंत सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणार आहेत, तर सुभाष नकाते यांच्या नृत्य कलावंताचा संच सोबत असणार आहे. मराठी ओव्या, लोकगीते ते आधुनिक गीतांचे सादरीकरण या कार्यक्रमात होणार आहे. संत परंपरा ते आधुनिक मराठी भाषेचे विविध आविष्कार कार्यक्रमात सादर होणार आहेत.

05 OCT 2026

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कवितेत वास्तवाचे अनेक पदर - वसंत डहाके

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

कोल्हापूर : कविता ही केवळ व्यक्तिगत नसते, तर तिच्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय वास्तवाचे अनेक पदर सामावलेले असतात. आजच्या मराठी कवितेत विस्थापन, बदलती कृषी संस्कृती, पर्यावरणाचा ऱ्हास, स्त्रीचे अस्तित्व आणि मानवी जगण्यातील संघर्ष यांचे संवेदनशील प्रतिबिंब उमटत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांनी येथे केले.



सतीश काळसेकर काव्य पुरस्कार प्रभा गणोरकर यांना प्रदान करताना डॉ. राजन गवस आणि वसंत आबाजी डहाके.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने यंदाचे सतीश काळसेकर काव्य पुरस्कार आणि ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार हे अनुक्रमे ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर आणि कवी रवी कोरडे यांना प्रदान करण्यात आले. पुरस्काराचे स्वरुप अनुक्रमे २१ हजार रुपये व १० हजार रुपये आणि शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह असे आहे. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

अध्यक्षीय मनोगतात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस म्हणाले, काळसेकर पुरस्कार हा मराठीतील महत्त्वाच्या कवींच्या सन्मानाची आणि साहित्यपरंपरेच्या जतनाची महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. प्रभा गणोरकर आणि रवी कोरडे यांनी पुरस्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कविता ननावरे आणि प्रांजली क्षीरसागर यांनी त्यांच्या निवडक कवितांचे अभिवाचन केले. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. गौतमीपुत्र कांबळे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. आर.जी. कुलकर्णी, डॉ. अवनीश पाटील, सुधीर पोटे, आदित्य काळसेकर, कुटुंबीय उपस्थित होते. मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक, प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन, डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

05 OCT 2026
तरुण भारत

मुंबई मराठी ग्रंथ मंडळ अध्यक्षपदी डॉ. मंजुश्री पवार यांची निवड

कोल्हापूर : मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयांतर्गत कार्यरत असलेल्या इतिहास मंडळाच्या अध्यक्षपदी शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी संचालक डॉ. मंजुषी पवार यांची निवड झाली आहे.



महाराष्ट्राच्या इतिहास संशोधनाला चालना देण्यासाठी कार्यरत असलेल्या या मंडळाच्या अध्यक्षपदाची महत्त्वाची जबाबदारी आता डॉ. पवार यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. प्रसिद्ध इतिहास संशोधक प्रा. जयसिंगराव पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या कन्या डॉ. मंजुषी पवार यांची इतिहास मंडळाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. महाराष्ट्राच्या इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात या मंडळाचे मोठे योगदान राहिले आहे. महाराष्ट्रातील इतिहास संशोधनाला चालना देण्यासाठी इतिहास मंडळाची स्थापना करण्यात आली होती. मंडळाच्या कार्यात अनेक नामवंत इतिहास संशोधकांचे योगदान राहिले आहे. यामध्ये डॉ. पी. एम. जोशी, दत्तो वामन पोतदार, डॉ. जयसिंगराव पवार यांचा समावेश आहे. आता डॉ. मंजुषी पवार यांच्या नेतृत्वाखाली मंडळाचे कार्य पुढे नेले जाणार आहे.

05 OCT 2026

लोकमत



श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात शनिवारी राष्ट्रीय परिसंवादावेळी मान्यवरांच्या हस्ते 'शहाजी वार्ता'चे प्रकाशन करण्यात आले.

'जयसिंगराव पवार यांनी पुराव्यांसह इतिहासाची पुनर्मांडणी केली'

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी विविध ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे इतिहासाची पुनर्मांडणी आणि पुनर्लेखन केले. राजर्षी शाहू महाराजांचे विचार जगभर पोहोचविण्यासह मराठ्यांच्या इतिहासाची व्याप्ती वाढविण्यात त्यांचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी शनिवारी केले.

शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या कर्मवीर वि. रा. शिंदे सभागृहात 'इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार : इतिहास लेखन, संशोधन आणि योगदान' या विषयावर आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे अध्यक्षस्थानी होते. यावेळी नगरसेवक इंद्रजित बोंद्रे, वसुधा पवार उपस्थित होत्या.

परिसंवादात डॉ. अवनीश पाटील, डॉ. आर. के. शानेदिवाण, डॉ. सुरेश शिखरे, डॉ. मंजुश्री पवार आदींनी डॉ. पवार यांच्या इतिहास लेखन, संशोधन आणि कार्याचा आढावा घेतला. डॉ. आर. डी. मांडणीकर यांनी स्वागत केले. प्रा. पी. के. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शिवाजी रायजादे यांनी आभार मानले.